ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# सामाजिक परिवर्तनातील बदलती मूल्ये

*प्रा. संतोष लक्ष्मण राणे,

* जोशी-बेडेकर कॉलेज, ठाणे

सारांश :

मानवी मूल्ये हा विषय मनुष्याच्या वैयक्तिक, सामाजिक, व्यावसायिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनाचा महत्वाचा घटक आहे.मानवी मूल्ये आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करतात. मानवी मूल्यांचा समाजाच्या विविध पैलूंवर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव पडतो. मग ते राजकीय असो, अर्थव्यवस्था असो, व्यवसाय असो, शिक्षण असो, मानवता असो, तंत्रज्ञान असो, नैतिक मूल्य असो, नैतिक मूल्य असो वा सांस्कृतिक मूल्य असो.

सध्याच्या जागतिक समाजाला अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. पृथ्वीवरील मानवी क्रियाकलापांचा विविध मार्गांनी होणारा परिणाम जनमानसात लक्षणीय प्रमाणात ताणतणाव करत आहे.

अशा परिस्थितीत, मानवी मूल्यांशिवाय मानवी समाज लक्षणीयरित्या टिकू शकत नाही. त्यामुळे या विषयावर चर्चा करून आधुनिक समाजात सामाजिक सुधारणांमध्ये मानवी मूल्यांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. कालानुरूप समाजात आणि समाज जीवनात अनेक आमूलाग्र बदल घडत असतात.

त्या अनुषंगाने मनुष्याच्या सामाजिक,वैयक्तिक जीवनात रूढ असलेल्या पद्धती, चाली रीती,परंपरा यामध्ये देखील कालपरत्वे बदल होणे अपेक्षित असते.यासाठी योग्य ते मार्गदर्शन आणि मनुष्य स्वभावाचा पाय दर्शविणारे घटक म्हणजेच मूल्ये.

हा शोधनिबंध सामाजिक सुधारणांमध्ये मानवी मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न आहे.यासाठी मुळात समाज म्हणजे काय, सामाजिक सुधारणा म्हणजे काय, मानवी मूल्ये कोणती आहेत, त्यांचे प्रकार कोणते आहेत हेही मुद्दे या शोध निबंधात अंतर्भूत केलेले आहेत.

भारतीय समाजात अनेक समाज सुधारकांनी आपले आयुष्य वेचून समाज सुधारणेसाठी अनेक आव्हाने पेलली. त्यापैकी काही सुधारकांची माहितीही या शोध निबंधात दिली आहे

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

**परिवर्तनातील बदलती मूल्ये:**



समाज सुधारणेत मानवी मूल्यांचे योगदान हा आजच्या सामाजिक जीवनाच्या अभ्यासक्रमाचा महत्वाचा विषय आहे.मनुष्य जीवन जगताना प्रत्येकालाच समाजाची आत्यंतिक गरज भासते. आयुष्याच्या विविध टप्प्यावर आपल्याला आपल्या आसपास समाजाच्या अस्तित्वाची आवश्यकता भासते. प्रत्येक व्यक्ती आपले सामाजिक जीवन जगत असतांना अन्य व्यक्तीशी आई, बहीण, मैत्रीण, भाऊ, पती, वडील, मालक, नोकर, सहकारी, सोबती,मैत्र अशा या ना त्या संबंधाने जोडलेली असते.

समाज सुधारणेत मानवी मूल्यांचे महत्व जाणून घेताना, सर्व प्रथम समाज म्हणजे काय आणि समाज सुधारणा म्हणजे नेमके काय हे जाणून घेणे महत्वाचे आहे. त्या अनुषंगाने मग या समाज सुधारणेत मानवी मूल्यांचे योगदान समजून घेता येईल आणि अभ्यासता येईल.

**समाजाची व्याख्या:**

समाजाची व्याख्या अनेक विचारवंतांनी आणि अभ्यासकांनी आपापल्या भाषेत अगदी नेमक्या भाषेत केलेली आहे.त्यातील काही ठळक व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. मॅक आयव्हर व पेज यांच्या मते समाजशास्त्र हे सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

२. फेअरचाईल्ड यांच्या मते मानव आणि मानवनिर्मित वातावरण यांच्यामधील संबंधाचे अध्ययन म्हणजे समाजशास्त्र होय.

३. गिन्सबर्ग यांच्या मते व्यक्ती व्यक्तींमधील आंतरक्रिया आणि त्यातून निर्माण होणारे परस्परसंबंध याच्या कारणांचे व परिणामांचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.

४. हॅरी जॉन्सन यांच्या मते सामाजिक समूह गट त्यांची संघटन पद्धती किंवा त्यांचे अंतर्गत स्परूप तसेच समूहाचे संघटन टिकवून ठेवण्याच्या पद्धती, समूहामध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रक्रिया आणि समूहांमधील परस्परसंबंध या सर्वांचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाज शास्त्र होय.

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

५. जॉर्ज सीमेल यांच्या मते समाजशास्त्र हे मानवी परस्परक्रियांच्या स्वरूपाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.

थोडक्यात सांगायचे तर, व्यक्ती विविध कारणामुळे परस्परांच्या संपर्कामध्ये येऊन परस्परांशी विविध प्रकारच्या आंतरक्रिया करतात आणि त्यातूनच त्यांना जोडणाऱ्या सामाजिक संबंधाची निर्मिती होते, अशा सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय.

समाजाचा अभ्यास म्हणजे सामाजिक संबंधाचा अभ्यास असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. समाजशास्त्राच्या अभ्यासाचा मुख्य विषय समाजातील व्यक्ती नसून समाजसदस्य असणाऱ्या व्यक्ती व्यक्तींमधील सामाजिक संबंध हा आहे. रोज जगभरात असंख्य व्यक्ती जन्माला येतात आणि मृत्यू पावतात, तरीही समाजाचे अस्तित्व तसेच सातत्य कायम असते.

**समाज सुधारणा:**



समाज म्हणजे काय हे समजून घेतल्यावर या समाजातील सुधारणा समजून घेणे प्राधान्य क्रमात येते. प्रत्येक समाजात काही विशिष्ट चाली, रीती, परंपरा, रूढी, पद्धती वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या रूढ असतात. त्यातील काही कालातीत होतात, काही काळानुसार बदलतात, काही कालबाह्य होतात पण तरीही सुरूच राहतात.

या प्रथा सुरु राहण्यामागची कारणे अनेक असतात. भिडस्त स्वभाव, समाजाचा पगडा, अंध श्रद्धा, नेतृत्वाचा अभाव, सामाजिक भीती, नाविन्याचा अभाव अशा अनेक मुद्द्यांमुळे वर्षानुवर्षे ठराविक चाली रीती सुरूच असतात.

जसा काळ बदलत जातो तसतसे यातील काही चाली रीती पाळणे कठीण होते, अशक्य होते, काही कालानुरूप अवाजवी भासतात त्यामुळे अशा चाली रीती बदलणे,
बंद करणे याला समाज सुधारणा करणे असे म्हणतात.

**व्याख्या:**

अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालून सामाजिक स्वास्थ्य व कल्याण यांसाठी केलेले उपाय व बदल

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

म्हणजेच समाज सुधारणा होय. समाजात बुद्धिपुरस्सर समाज हितकारक केलेले बदल म्हणजे समाज सुधारणा असे म्हणता येईल.

**हेतू:**

समाज सुधारणा करण्या मागचा मूळ हेतू काय? तर लोकांचे भावनिक, आत्मिक, शारीरिक , सामाजिक, मानसिक, बौद्धिक अबाधित राखणे, संतुलन कायम ठेवणे हाच समाज सुधारणेचा मूळ उद्देश आहे. कालानुसार व त्या त्या भौगोलिक सामाजिक कायद्यानुसार या समाज सुधारणेचा परीघ आणि व्याप्ती बदलत असते. सुधारणा आणि संस्कृती या मनुष्याच्या अभिव्यक्तीतून निर्माण झालेल्या मानवनिर्मित परंपरा व चालीरीती आहेत. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजाची सर्वांगीण सुधारणा असते.

शिक्षणामुळे संस्कारित झालेल्या सुसंकृत आणि सुशिक्षितांना समाजाकडे बघण्याची नवी, बुद्धीवादी, मानवतावादी दृष्टी प्राप्त झाली. आपल्या समाजातील जाचक रूढी आणि अंधश्रद्घा नाहीशा व्हाव्यात या धारणेने समाज सुधारणेची गरज भासू लागली.

सामाजिक सुधारणा या कोण्या एका व्यक्तीसाठी नाही तर संपूर्ण समाजासाठी केल्या जातात. त्यात एखाद्या समूहाचे प्रश्न, समस्या हाताळले जातात. सामाजिक सुधारणांचा उद्देश फक्त समस्या निवारण नसून सामाजिक विकास आणि प्रगती साधणे ह्याही उद्देशाने सामाजिक सुधारणांचा उगम होतो. उदा., सेना–व्यवस्था, कायदा सुव्यवस्था आणि पोलीस खाते या क्षेत्रात नव्या आचारसंहिता लागू करणे

**सामाजिक सुधारक:**



समाजात पूर्वापार चालत आलेल्या अनेक रूढी आज समाज सुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे आज नष्ट झालेल्या आहेत. स्त्री पुरुष असमानता, सती प्रथा, स्त्रियांवरील शैक्षणिक— सामाजिक — सांस्कृतिक बंधने , जाती भेद आज संपुष्टात आलेले आहेत. सर्व समाज सुधारकांनी मानवी मूल्यांचाच आधार घेत समाज सुधारणेचे व्रत हाती घेतले.

समाज सुधारणा म्हणजे काय हे जाणून घेतल्या नंतर उदाहरणासहीत ते समजून घेण्यासाठो अविस्मरणीय समाज सुधारकांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

राजा राममोहन रॉय (१७७२—१८८३) यांनी समाजसुधारणांची परंपरा सुरू केली. त्यांनी केलेल्या ब्रह्म समाजाच्या स्थापनेमुळे भारतात एक नवीन युग अवतरले. बुद्धीप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र आणि मानवी समानता ही तीन मूल्ये त्यांनी भारतीय समाजाला उपलब्ध करून दिली. सती प्रथा,कन्याविक्रय, बालविवाह या परंपरा बंद व्हाव्या यासाठी त्यांनी आंदोलन केले. यात सर्वप्रथम सती प्रथा बंद करून त्यांनी समाजातील स्त्रिया, महिलांवर लादली गेलेली अनिष्ट पद्धत हद्दपार केली.

केशवचंद्र सेन यांनी विधवांच्या पुनर्विवाहासाठी बंगालमध्ये ब्राह्मो समाजातर्फे चळवळ सुरू केली.

ख्रिस्ती मिशनृयांनीही स्त्री शिक्षणाच्या संदर्भात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. १८१९मध्ये मुलींसाठी पहिली शाळा त्यांनी कोलकात्यात काढली. १८३४ पर्यंत कोलकात्यात मुलींसाठी तीन शाळा सुरु झाल्या होत्या.

महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा स्थापन केली.अस्पृश्यांसाठीही त्यांनी शाळा काढली. अस्पृश्यांना पिण्याचे पाणीही सहजपणे मिळत नसे. जोतीरावांनी आपल्या वाड्यातला पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. अंधश्रद्धेचे निर्मूलन करून वैचारिक कांती घडवून आणण्यासाठी तसेच समताप्रधान समाजाच्या निर्मितीसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी लढा दिला.

धोंडो केशव कर्वे (१८५८—१९६२) ह्यांनी विधवेशी पुनर्विवाह केला होता. १८९३ साली त्यांनी विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळ काढले. १८९९मध्ये त्यांनी अनाथ बालिकाश्रम ह्या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेतर्फे महाराष्ट्रभर कन्याशाळांचे जाळे निर्माण झाले.

राजर्षी शाहू छत्रपतींनी महात्मा फुलेंच्या सत्यशोधकी तत्त्वांना पाठिंबा दिला. राजर्षींनी खेड्यापाड्यांतील विविध जातिजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांना इंग्लंडमधील उच्च शिक्षणास त्यांनी आर्थिक मदत केली. जातिभेद निर्मूलनाचा एक मार्ग म्हणून आंतरजातीय विवाहांना त्यांनी कायद्याने मान्यता दिली. बालविवाहाला प्रतिबंध केला. घटस्फोटास व विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी म.फुलेंनी जागृती निर्माण केली होती.

ISSN–2277- 8721

**EIIRJ** Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II    Nov – Dec 2022

OPEN ACCESS    Original Research Article

डॉ. आंबेडकरांनी स्वत:कष्ट करून शिक्षण घेऊन आपल्या अस्पृश्य गणलेल्या समाजबांधवांना शिका, संघटित व्हा आणि लढा हा संदेश दिलाय त्यांच्यासाठी शिक्षणसंस्था उभी केली.

महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , कर्मवीर भाऊराव पाटील, पंडिता रमाबाई, रघुनाथ धोंडो कर्वे इत्यादींनी समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

अनिष्ट सामाजिक रुढींविरुद्ध लढा दिला. ह्या सर्व समाजसुधारकांनी धडाडीने केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचा विचार जन्माला आला आणि सर्वमान्य झाला.

**सामाजिक मूल्यांचे योगदान:**



समाज, समाज सुधारणा आणि समाज सुधारक ह्या सर्व संकल्पना आणि संज्ञा समजून घेतल्यानंतरच्या या पार्श्वभूमीवर या समाज सुधारणेच्या कार्यात सामाजिक मूल्यांचे योगदान काय आहे, त्यांचे महत्व काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

मूल्ये सामाजिक संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. कोणती कार्ये योग्य आणि महत्त्वाकांक्षी आहेत ते सांगण्याचे काम मूल्ये करतात. सामाजिक मूल्ये व्यक्तीचे सामाजिकीकरण करण्याचा प्रयत्न करते.

**सामाजिक मूल्य व्याख्या:**



वुडसच्या मते ‘‘मूल्ये ही दैनंदिन जीवनात महत्वाची आहेत. सामान्य तत्त्वांवर नियंत्रण ठेवण्याचे काम मूल्ये करतात.

- जोंसांस्यच्या म्हणण्यानुसार, ‘‘मूल्याधारित समाज हे खरे समाजाचे संस्थात्मक स्वरूप आहे.
- रॉबर्ट बिर्स्टेड यांच्या मते,‘‘सामाजिक मूल्ये ही समाजाच्या संकल्पनेचा विचार करण्याचा एकमेव मार्ग आहे‘‘.

मानवी मूल्ये ही सकारात्मक संकल्पना आहे. ते केवळ वैयक्तिक गुण नाहीत. जगा आणि जगू द्या हे जीवन तत्व मूल्ये सांगतात. प्रदेश, संस्कृती किंवा धर्म कोणताही, प्रत्येक समाजात मूल्यांचे महत्व अनन्य साधारण आहे.

**मूल्याचे प्रकार:**

समाज सुधारणे बाबत मूल्यांचे महत्व जाणून घेताना मनुष्याच्या वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनाच्या विविध घटकांचा विचार करणे आवश्यक आहेत. त्या त्या घटकानुसार मूल्ये विभागली आणि अभ्यासली जातात. याच अनुषंगाने, मूल्याचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत :

- वैयक्तिक मूल्ये
- कामाची मूल्ये
- व्यवसाय मूल्ये
- धार्मिक मूल्ये
- कौटुंबिक मूल्ये
- सामाजिक मूल्ये
- राजकीय मूल्ये
- सौंदर्यात्मक मूल्ये
- नैतिक मूल्ये
- भौतिक मूल्ये

सर्वात महत्वाच्या सामाजिक मूल्यांची यादी पुढील प्रमाणे आहे:

१ — समानता

२ — न्याय

३ — आनंद

४ — प्रामाणिकपणा

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

५ — आशा

६ — कृतज्ञता

७ — जबाबदारी

८ — बंधुभाव

९ — मैत्री

१० — प्रेम

११ — सौजन्य

१२ — आदर

१३ — संयम

१४ — सहनशीलता

१५ — समर्पण

१६ — आशावाद

१७ — सहकार्य

१८ — वचनबद्धता

१९ — क्षमस्व

२० — एकात्मता

२१ — औदार्य

२२ — नम्रता

२३ — एकता

२४ — सहानुभूती

२५ — सकारात्मकता



ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

**मानवी मूल्यांचे समाज सुधारणेत महत्त्व:**

सामाजिक शास्त्रांमध्ये मानवी मूल्ये ही एक मध्यवर्ती संकल्पना आहे.मानवी मूल्ये समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात, कारण त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी मानवाचा आधार असल्याचे म्हटले जाते. असे मानले जाते. की सर्व धर्मांच्या सर्व पवित्र पुस्तकांमध्ये चांगल्या जीवनाची मूल्ये आहेत.जागतिक संबंधात मूल्यांचे महत्त्व वारंवार सांगितले जाते. राष्ट्रीय समस्या, मग ते आंतरराष्ट्रीय संमेलनांमधील वादविवादात असोत, संशोधनाच्या ''मूल्य—मुक्त'' दृष्टिकोनांवर टीका करणाऱ्या अभ्यासात असोत किंवा जीवनाचा दर्जा आणि वैयक्तिक पूर्तता यांच्या चर्चेत असोत. अशा प्रकारे, सांस्कृतिक प्रश्नांमध्ये मूल्ये विशेषत: महत्त्वपूर्ण मानली जातात. विकास सांस्कृतिक वारसा जपण्याच्या काळजीत ते केंद्रस्थानी आहेत.

मानवी मूल्यांचे महत्त्व बालपणापासूनच दिसून येते. शाळा हा पहिला टप्पा आहे जो मानवी मूल्यांच्या माहितीचा पाया आहे. कारण जीवनमूल्यांची माहिती ही समाजात आढळणारी निरंतर प्रक्रिया आहे. व्यक्ती आणि समाजाच्या जीवनात मानवी मूल्यांवर परिणाम करणारे वेगवेगळे घटक असतात. मूल्यशिक्षण कुटुंबापासून सुरू होते आणि ते शिक्षकांच्या मदतीने शाळांमध्ये सतत चालू असते. यामुळे, कुटुंब, शिक्षक आणि शैक्षणिक कार्यक्रम हे मूल्य शिक्षणासाठी महत्त्वाचे आहेत. कुटुंब हे माहितीचे पहिले स्त्रोत आहे.म्हणून त्यांनी त्यांच्या वागणुकीबद्दल सावधगिरी आणि काळजी बाळगली पाहिजे. कारण मुले त्यांनाच आदर्श म्हणून पाहतात.

मानवी मूल्य हा ''जगातील कोणत्या गोष्टी चांगल्या, इष्ट आणि महत्त्वाच्या आहेत'' याबद्दलचा सिद्धांत आहे.आधुनिक समाज गेल्या काही दशकांपासून अनेक गंभीर संकटातून जात आहे. आधुनिकतेच्या प्रक्रियेमुळे त्यांचे पारंपारिक सामाजिक—नैतिक मूल्य धोक्यात येत आहे, असे आधुनिक लोकांना वाटते. म्हणून, पारंपारिक सामाजिक आणि नैतिक मानके आणि आधुनिक मूल्ये यांच्यात समतोल साधून त्यांची पारंपारिक सामाजिक आणि नैतिक व्यवस्था आणि ओळख जतन करणे आवश्यक आहे.

समाज सुधारणेचे महत्व लक्षात घेऊन शाळेपासून ते विद्यापीठीय स्तरापर्यंत मूल्याधारित शिक्षणावर भर दिला जात आहे.मानवी मूल्ये समाजात खूप आघाडीची भूमिका बजावतात.मानवी मूल्य ही सर्वसाधारणपणे मानवजातीची संकल्पना आहे.व्यक्ती ही प्रमुख असते हे खरे आहे, परंतु जोपर्यंत व्यक्ती समाजात अस्तित्वात आहेत तोपर्यंत आधुनिक समाज कधीही त्याचे अस्तित्व वाढणार नाही असे ठामपणे म्हणता येईल.आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, दळणवळणात कमालीची सुधारणा झाली आहे, म्हणून आपण जे काही बोलतो, करतो किंवा विचार करतो त्याचा थेट परिणाम समाजावर होतो.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

परिणामी, मानवी मूल्ये कोणत्याही मानवी समाजाच्या अखंडतेसाठी आणि दीर्घायुष्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

**निष्कर्ष:**

सामाजिक सुधारणा केवळ संकटे कमी करण्यासाठीच नव्हे तर वैयक्तिक आणि सामुदायिक, सामाजिक जीवनाला अशा प्रकारे बदलण्याची गुरुकिल्ली आहे जी जीवनाकडे रचनात्मक आणि सकारात्मक

दृष्टीकोनासाठी अनुकूल परिस्थिती प्रदान करू शकते, सर्जनशीलता मुक्त करते आणि जग सुधारते. समाजसुधारणेची ही समृद्ध परंपरा लक्षात घेता, भारतातील वाढत्या आव्हानांमुळे सामाजिक सुधारणांना ग्रासले आहे, हे समाजाच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक आहे. हे संपुष्टात येण्याची आणि योग्य रीतीने प्राधान्य दिलेल्या सामाजिक सुधारणांना पुन्हा देशाच्या एकूण अजेंड्यात अत्यंत आवश्यक आणि योग्य महत्त्व मिळण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर समानता, न्याय,आनंद, प्रामाणिकपणा, आशा, कृतज्ञता, जबाबदारी, मैत्री, प्रेम, बंधुभाव, सौजन्य, आदर, संयम, सहनशीलता,आशावाद, सहकार्य, वचनबद्धता, क्षमाशीलता या मानवी मूल्यांचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित होते.

**संदर्भ सूची:**

**पुस्तके :**

- डॉ. पिंगला हेमचंद्र धांडे (२०१९) २१व्या शतकातील शिक्षण, प्रशांत पब्लिकेशन
- डॉ. सुमती रिसबूड (२०१८) आधुनिक मराठी साहित्यातील परतत्त्वबोध, रामकृष्ण मठ, नागपूर
- किरण वढेरा (२०१२) एम्पॉवेरिंग रूरल वूमन, सेज पब्लिकेशन
- डॉ. भालेराव जे.के (२०२१) सु–प्रशासन, एजुकेशनल पब्लिकेशन अँड डिस्ट्रिब्युटर्स

**वेबसाइट माहिती स्रोत :**

- Thestatesman.com
- Slideplayer.com
- Esakal.com
- Vinaymarathi.in
- www. India.gov.in

**Cite This Article:**

* ***प्रा. संतोष लक्ष्मण राणे,(2022)*** सामाजिक परिवर्तनातील बदलती मूल्ये, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 92-101.*